महाराष्ट्राचा मानबिंदू म्हणून मुंबई महानगरीचाच विचार करावा लागतो. उद्योगनगरी, आर्थिक राजधानी, आंतरराष्ट्रीय महानगराचा नावलौकिक अशा विविध प्रकारांनी मुंबईचे महत्व अधोरेखित होते. आज आपण २१ व्या शतकात आहोत. तीनशे वर्षापूर्वी ब्रिटीशांनी या महानगरीचे नियोजन करताना काही सोयीसुविधा केल्या. त्या त्यांना त्यांचा राज्यकारभार व्यवस्थित करता यावा म्हणून केल्या होत्या. त्यांना तर आता आपण भारतावर कायमच राज्य करणार आहोत असा आत्मविश्वास निर्माण झाला होता. ते गृहित धरूनच त्यांनी भारतात भक्कम स्वरुपाच्या इमारती आणि भव्य रस्ते बांधून ठेवले होते. आता या नियोजनाची मुदतही संपत आली आहे.


# भविष्यात मुंबईत पर्यटन आणि सेवा उद्योग वाढणार

दिलीप देशमुख,
ज्येष्ठ वास्तूशास्त्रज्ञ



महाराष्ट्राचा मानबिंदू म्हणून मुंबई महानगरीचाच विचार करावा लागतो. उद्योगनगरी, आर्थिक राजधानी, आंतरराष्ट्रीय महानगराचा नावलौकिक अशा विविध प्रकारांनी मुंबईचे महत्व अधोरेखित होते. आज आपण २१ व्या शतकात आहोत. तीनशे वर्षापूर्वी ब्रिटीशांनी या महानगरीचे नियोजन करताना काही सोयीसुविधा केल्या. त्या त्यांना त्यांचा राज्यकारभार व्यवस्थित करता यावा म्हणून केल्या होत्या. त्यांना तर आता आपण भारतावर कायमच राज्य करणार आहोत असा आत्मविश्वास निर्माण झाला होता. ते गृहित धरूनच त्यांनी भारतात भक्कम स्वरुपाच्या इमारती आणि भव्य रस्ते बांधून ठेवले होते. आता या नियोजनाची मुदतही संपत आली आहे. साधारणपणे कोणत्याही महानगराचे नियोजन पुढची दोनशे ते तीनशे वर्षे डोळ्यासमोर ठेवून केले जाते. अशा परिस्थितीत मुंबईच्या नियोजनाचा विचार केला तर आताच तिच्या सर्वंकष विकासाचा अतिशय मूलगामी स्वरुपाचा आराखडा तयार करणे अत्यंत आवश्यक आहे.

मुंबईच्या नगरनियोजनाविषयी विशेष अभ्यास असलेले ज्येष्ठ वास्तुविशारद श्री दिलीप देशमुख यांनी एकूणच मुंबईच्या नगर नियोजनाबरोबर पुढच्या तीनशे वर्षांच्या भवितव्याबाबत काही आधुनिक संकल्पनांची मांडली केली आहे. सध्या मुंबई महापालिकेच्या विकास आराखड्यावरून बरेच वाद निर्माण झाले आहेत. २०३४ पर्यंतच हा विकास आराखडा सादर करताना मुंबई महापालिकेने नगर नियोजनाचा खूपच मर्यादित दृष्टीकोन बाळगलेला दिसतो. अर्थात कायदा आणि नियमाप्रमाणे नगरविकास आराखडा तयार करताना तो पुढच्या वीस वर्षांचा विचार करुनच मांडावा लागतो ही गोष्ट खरी आहे. परंतु आता मुंबईबाबत इतक्या मर्यादित काळाचा विचार करून नगरनियोजन करणे त्रासाचे धोक्याचे ठरु शकते. यावेळच्या विकास आराखड्याबाबत न भूतो न भविष्यती असा हरकती नोंदवल्या गेल्या, तब्बल ५० हजारापेक्षा जास्त सुचना हरकती प्राप्त होतात. याचाच दुसरा अर्थ एकूण मुंबईच्या नगरनियोजनाबाबत किंवा



पुढच्या पाच वर्षात समुद्रात उभे राहणारे शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक हे जसे वैशिष्ट्यपूर्ण ठरेल तसेच मुंबई पोर्ट ट्रस्टतर्फे आखल्या जात असलेल्या तरगत्या हॉटेलांची योजना किंवा गोव्यासारखी पर्यटकांना समुद्रात फिरवून आणणारी क्रूझ सेवा अशा पध्दतीचा मोठे उत्पन्न मिळवून देणारा पर्यटन व्यवसाय मुंबईचे महत्व वाढवणारा ठरेल.

सोयी सुविधांबाबत नागरिक मोठ्या प्रमाणात सजग आहेत हे सिध्द होते.याशिवाय दुसरा अत्यंत महत्वाचा मुद्दा म्हणजे मुळातच जागेची टंचाई असलेल्या मुंबईसारख्या बेटाला भविष्यकाळात आणखीनच महत्व प्राप्त होणार आहे. ब्रिटीशकालीन नगरनियोजनाचे आयुष्य संपले आहे. आता पुढच्या २००-३०० वर्षाचा विचार करुन केवळ नगर नियोजन नव्हे तर नगरसंयोजन करावे लागणार आहे आणि ते करण्याची हीच योग्य वेळ आहे.मुंबई महापालिकेने तयार केलेल्या विकास आराखडा मुख्यमंत्र्यांनी रद्द केला आहे आता पुढच्या चार महिन्यात नवा विकास आराखडा तयार होईल.त्याची प्रक्रीया सुरु होत असतानाच जर काही मुलभूत संकल्पनांचाविचार झाला तर तो शासन जनता मुंबईची आंतरराष्ट्रीय प्रतिमा यासाठी उपयुक्त ठरु शकेल.

सर्वप्रथम मुंबईच्या विकास आराखड्याचा विचार करताना त्याची दोन भागात मांडणी करता येईल एक म्हणजे दृष्टीपथात मुंबई आणि मुंबईचा भविष्यवेध.पहिल्या भागात नियोजनात विचार करताना सद्यस्थितीचा आढावा घेऊन तातडीने कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे. याचा प्राधान्यक्रम नक्की करावा लागेल.म्हणजे येत्या २०-२५ वर्षात ज्या समस्या प्रभावीपणे पुढे येणार आहेत त्याचे निराकरण करण्याच्या उपाययोजना आखाव्या लागतील.यामध्ये रस्ते,रुग्णालये परवडणारी घरे याचा प्रामुख्याने समावेश करावा लागेल.तर दुसऱ्या भागात मुंबईचे आंतरराष्ट्रीय महत्व लक्षात घेऊन या महानगरात सोयीसुविधा निर्माण कराव्या लागतील.मुंबईवरचा ताणहलका करण्यासाठी एकातासाच्या अंतरावर असणाऱ्याशहरांमध्येसुध्दा तिथे ज्यादा चटई निर्देशांक देण्यापासून मेट्रो मोनो सारख्या सुविधा उपलब्ध करुन देण्याचा विचारकरावा लागेल.ज्यामुळे मुंबईत होणारी गर्दी काही प्रमाणात रोखता येऊ शकेल.प्रचंड वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाचा विचार करुन या नियोजनात विकासाचे नवे मापदंडही निश्चित करावे लागतील.ज्यामध्ये उन्नत रस्ते,मेट्रो,मोनो यांच्याशिवाय उन्नत विमानतळांसारख्या कल्पना प्रत्यक्षात आणण्याचे धारिष्ट्य दाखवावे लागेल.म्हणूनच मुंबईसारख्यामहानगराचा विकास आराखडा केवळ काही आरक्षणे दाखवणारा काही गोष्टी वगळणारा किंवा ज्यादा एफएसआय देऊन मुंबईचे भवितव्य रंगविणारा नकाशा ठरु शकत नाही.तो व्यापक प्रगत विकसित दृष्टी असणाऱ्या सुविधांचे अवकाश सामावून घेणारा आत्मविश्वास असला पाहिजे.



सर्वात महत्वाचे म्हणजे भविष्यकाळाचा विचार केला तर पुढच्या पंचवीस वर्षात मुंबईची कार्यसंस्कृतीच बदलली जाईल. मुंबई ही पर्यटन आणि सेवा उद्योगपुरवणारी सर्वात मोठी महानगरी ठरु शकते.मुंबईचे भौगोलिक आणि नैसर्गिक वैशिष्ट्य लक्षात घेतले तर इथला सागरकिनारा इथे कालांतराने विकसित झालेल्या आधुनिक स्वरुपाच्या उत्तुंग इमारती मॉल्स एस्सेलवर्ल्डसारखे वॉटर किंगडम, भव्य स्वरुपातला पॅगोडा, घारापूरी लेण्या किंवा गेटवे ऑफ इंडियाचा परिसर, राणीचा मणिहारम्हणजेच क्विन्स नेकलेस म्हणून प्रसिध्द असलेला मरीन ड्राईव्ह. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान या गोष्टी आजच पर्यटनाच्या आकर्षणाचा विषय ठरतात. पुढच्या पाच वर्षात समुद्रात उभे राहणारे शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक हे जसे वैशिष्ट्यपूर्ण ठरेल तसेच मुंबई पोर्ट ट्रस्टतर्फे आखल्या जात असलेल्या तरगत्या हॉटेलांची योजना किंवा गोव्यासारखी पर्यटकांना समुद्रात फिरवून आणणारी क्रूझ सेवा अशा पध्दतीचा मोठे उत्पन्न मिळवून देणारा पर्यटन व्यवसाय मुंबईचे महत्व वाढवणारा ठरेल. याशिवाय इथे असलेली आयटी इंडस्ट्री किंवा मोठमोठ्या राष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांची मुख्यालये दूतावास,शिवाय काही कंपन्यांची मार्केटिंग करणारी यंत्रणा मुंबईमध्ये आहे.यासर्वांना लागणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या सेवा म्हणजे संगणक यंत्रणेपासून तेकुरियरसेवेपर्यंत किंवा त्यांच्या लॉजिंग बोर्डिंगपर्यंतच्या सेवा पुरवण्याचे काम भविष्यकाळामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढू शकते.हा मुद्दा लक्षात घेऊन मुंबईच्या विकासाचे नियोजन करावे लागेल आणि त्यालाही तितकेच प्राधान्य द्यावे लागेल.

■■■